
ISBN 978-81-925358-4-5







# भारतीय मुस्लिमांची सामाजिक व शैक्षणिक स्थिती

■ संपादक :
प्रा. रामकिशन हरीदास मुंडे

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 31) Reservation for Community Muslims | Smt. Sayyed Shaheen Shafi | 129 |
| ३२) इल्साम धर्मांची मुलभूत तत्त्वे | प्रा. राजेश अनंतराव कांबळे | १३४ |
| ३३) इस्लाम धर्माचा उगम व मूलभूत तत्त्वे | प्रा. श्री. पवळ अयोध्या दत्तात्रय | १३७ |
| ३४) मुस्लिमकालीन शिक्षण केंद्राची आजच्या शिक्षणात उपयुक्तता | गायकवाड राजरत्न सुंदरलाल, वंजीरे राम गंगाधर | १४० |
| ३५) इस्लाम धर्म व त्याची मुलतत्त्वे | डॉ. पुरुषोत्तम भगवंता मनगटे | १४२ |
| ३६) संगीत क्षेत्र में मुसलमानों का योगदान | आरेफ युसुफ बेग | १४९ |
| ३७) नाटककार जावेद पाशा यांच्या नाटकातील दारिद्र्य, विषमतावाद, व्यव्यस्थेविरोधीचे परखड विचार | अनिल उत्तमराव साळवे | १५२ |
| ३८) संगीत क्षेत्रातील मुस्लिमांचे कार्य | प्रा. गजानन मा. लोहटे | १५५ |
| ३९) मुस्लिम समाजाचे चित्रपट क्षेत्रातील कर्तृत्व विशेष संदर्भ : दिलीपकुमार (युसुफ खान) | प्रा. हमीद उमरअली काझी | १५८ |
| ४०) मल्लविद्येतील जगज्जेता महंमद गामा | डॉ. शेखर ना. शिरसाठ | १६६ |
| ४१) भारतीय क्रीडा प्रकारात मुस्लिम खेळाडुचे योगदान | प्रा. डॉ. पंडीत पी. ए. प्रो. चाटसे ए. जे. | १६८ |
| ४२) भारतीय क्रिकेट क्षेत्रात मुस्लिम खेळाडुंचे योगदान | प्रा. बी.डी. लाड, जे. ई. गुपीले, प्रा. एस. एस. जोंधळे | १७१ |
| ४३) मुस्लिम राजवटीतील शारीरिक शिक्षण | प्रा. शेख मुसाभाई इमामभाई प्रा. वाघ सुभाष फकीरा | १७३ |
| ४४) इस्लामच्या कायदेव्यवस्थेचे सामाजिक स्वरुप (शरियत) | प्रा. डॉ. भगवान डोंगरे | १७५ |
| ४५) भारतीय संगीतामध्ये मुस्लिमांचा सहभाग | प्रा. संजय पत्की | १७८ |
| ४६) प्रसार माध्यमातील भारतीय मुस्लिम समाजाची प्रतिमा | प्रा. गनी पटेल | १८४ |
| ४७) मुस्लिम समाज- स्थिती आणि गती | प्रा. युवराज धबडगे | १८९ |
| ४८) मध्ययुगीन मुस्लिम राजवटीत मल्लविद्येचा विकास | प्रा. डॉ. कल्पना बा. झरीकर | १९२ |


❒❖❒

Scanned by CamScanner

ISBN-978-81-925358-4-5



# इस्लाम धर्माचा उगम व मूलभूत तत्त्वे

प्रा. श्री. पवळ अयोध्या दत्तात्रय
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गडी

**प्रस्ताविक:-**

धर्म म्हणजे आचरण आणि या विविध आचरणांचे एकत्रीकरण होय.धर्म म्हणजे कोणत्या ना कोणत्या अतिमानवी अलौकीक किंवा अति सामाजीक शक्तीवरील विश्वास होय.ज्या विश्वासास भय,श्रध्दा,भक्ती पावित्र्याची धारणा असते व ज्या विश्वासाची प्रार्थणा,पूजा व आराधणा ईत्यादीतून अभीव्यक्ती होते. भारतीय समाज हा अनेक धर्माचा मिळुन बनलेला आहे.येथे हिंदू, बौध्द,जैन, शीख, ख्रिश्चन, इस्लाम या सारखे प्रमुख धर्म आहेत.

**इस्लाम धर्माचा उगम:-**

जेव्हा जेव्हा समाजात आराजकता निर्माण होते,नीतीमूल्ये निच्चांक गाठतात,शासनयंत्रना शिथिल बनते,समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी कोणीही नेता नसतो. तेंव्हा अशांतता,अराजकता अनैतीक परीस्थीतुन समाजाला तारून नेणारे एखादे व्यक्तीमत्व त्या समाजात जन्म घेत असते.अरबस्तानात अशाच एका व्यक्तीमत्वाचा जन्म झाला.ज्याचे नांव 'महंमद पैगंबर' असे होते.याच महंमद पैगंबराने इस्लाम धर्माची स्थपना केली.

**पैगंबराचे व्यक्तीमत्व:-**

महंमद पैगंबराचा जन्म ५७० साली अरबस्तानात 'मक्का' या ठिकाणी झाला.पैगंबर कुरेशी धराण्यातले होते.पैगंबरांच्या जन्मापूर्वीच त्यांच्या वडीलांचे निधन झल्यामुळे व त्यांच्या आईचेही बालपणीच निधन झल्यामुळे त्यांचे संगोपन 'अबुतालीब' नावाच्या चुलत्याने केले.पैगंबर व्यापारासाठी चुलत्याबरोबर प्रवास करीत असत.एकदा प्रवासात महंमद पैगंबराच्या प्रमाणीक आणि सचोटीच्या व्यवहारावर' खातिजा' नावाची एक स्त्री प्रभावीत झाली आणि ते दोघे विवाहबध्द झाले.

महंमद पैगंबर हे पहिल्यापासूनच चिंतनशिल प्रवृत्तीचे होते .मक्के जवळील गुहेत ते रात्र न रात्र निवास करीत.अरबस्तानातील परीस्थितीवर चिंतन व मनन करीत.एकदा एक भव्य-दिव्य पुरूषाकृती त्यांना दिसलीआणि 'तू इश्वराचा संदेशवाहक आहेस'. अशी वाणी ऐकू आली. ही पुरूषाकृती म्हणजे 'गॅब्रिएल'. गॅब्रिएल हा देवदूत होता.वाणी ऐकू आल्यापासून ईश्वराचा प्रेषित म्हणून महंमदाचे जीवनकार्य सूरू झाले.पूर्वीचे महंमद साक्षात्काराने महंमद पैगंबर बनले.

गॅब्रिएल या देवदूताने ईश्वराकडून महंमद पैगंबर यांना जे ज्ञान झाले ते असे होते "तो परमेश्वर कृपाळू , सर्वशक्तीमान आहे , तो अद्वितीय आहे, मानवाचे कल्यान करनारा तारणहार आहे, म्हणून त्या परमेश्वरावर श्रध्दा ठेवली पाहीजे, त्याच्या विषयी कृतज्ञता बाळगली पाहीजे.परमेश्वराविषयीची कृतज्ञता वाणीतून आणि व्यवहारातून व्यक्त व्हावी.एक एक दिवस या जगाचा अंत निश्चित होणार आहे.त्या अखेरच्या दिवशी या परमेश्वरासमोर प्रत्येकाला आपल्या आयुष्यभरातील कृत्यांची झाडाझडती दयावी लागणार आहे". गॅब्रिएलच्या वरील संदेशाचे सार महंमद पैगंबराने इतरांना सांगितले तीच इस्लाम धर्माची स्थापना माण्यात येते.इ. स. ६१० साली इस्लाम धर्माची स्थापना झाली. इस्लाम हा अरबी शब्द आहे. त्याची व्युत्पत्ती सिलम या धातू पासून झाली आहे. 'इस्लाम' या शब्दाचा अर्थ शरण येणे एवढाच नाही तर शांतता ,तह करणारा,सुरक्षीतता, शरणागतीहा आहे.याच अर्थाने इस्लामची व्याख्या खालील प्रमाने करता येते " परमेश्वराला अत्मसमर्पण कराणारा धर्म म्हणजे इस्लाम धर्म होय"-Islam is the Religion of self surrender of God.

इस्लाम धर्माची स्थपना शांती प्रस्थपीत करण्यासाठी झली. गॅब्रिएलने त्यांना नव्या धर्माचे संस्थापक व त्या धर्माचा पैगंबर होण्याचा संदेश दिल्यानंतर महंमदास पीमेश्वराचा संदेशदूत ,नबी, रसूल अशा अनेक विशेष नावाने संबोधू लागले.इस्लाम धर्माची सर्वात महत्वाची गोष्ट ही की कुराणने अनेकेश्वरवाद व मूर्तीपूजा यांना कडाडून विरोध केला व परमेश्वर एकच आहे या कल्पनेचा पुरस्कार केला.आर्थिक शोषणाचा अंत करून विश्वभ्रातृत्व,सच्चरित्रता आणि पवित्रता यांचा संदेश दिला. स्त्रीला सन्मान देण्याचे आवाहन केले तसेच अनाथ,निधंन आणि फकीर यांना सहारा देण्याचा उपदेश दिला.अशा रितीने अस्तव्यस्त झलेल्या ,मार्गच्युत झलेल्या अरबी समाजाला सुव्यवस्थीत रूप देउन मार्गावर आणण्याचे काम इस्लामने केले.

इस्लामने आपल्या अनुयायांना त्यांनी मानवी जीवनात कसे वागावे यासंबंधि अनेक नियम सांगीतले आहेत. या नियमांचे पालन करणे हे प्रत्येक मुसलमानांचे कर्तव्य मानले गेले आहे. याला इस्लामची शिकवणूक व आचार म्हणता येईल. इस्लामचे यतार्थ पालन करणाऱ्या व्यक्तींना "मुअमिन" असे म्हटले जाते.



Scanned by CamScanner

इस्लाम धर्माची मुलतत्वे

इस्लाम धर्मांचा पहिला भाग श्रद्धेचा आणि दूसरा भाग अमल. अमल म्हणजे प्रत्यक्ष कृतीचा. इस्लाम धर्मांची कलमा, नमाज, रोजा, जकात आणि हज हीच पाच आधारभुत तत्वे किंवा आधारस्तंभ आहेत.
याच पाच आधारभुत तत्वांना इस्लामिक आवर प्रणाली (way of life) असे म्हणतात.

**१. कलमा(कलम-ए-तय्यबा व कलम-ए-शहादत्त) :-** कलमा हे इस्लाम धर्माचे पहिले तत्त्व आहे. कलम्याचे पठण करणे म्हणजे ईश्वर एकच आहे आणि महंमद हे त्यांचे पैगंबर आहे अशी घोषणा करणे याला कलमा पढणे असे म्हणतात. इस्लाम धर्मात कुराण हा पवित्र ग्रंथ असून त्यात कलम-ए-तय्यबा व कलम-ए-शहादत्त हे दोन मंत्र आहेत. या मंत्रांचा अंतकरणापासून स्विकार करणे व मुखाने त्यांचे पुनरूच्चार करणे अत्यंत महत्वाचे मानले जाते. कलम-ए-तय्यबा म्हणजे वाक्य, शब्द किंवा वचन तर तय्यबा किंवा तय्यब म्हणजे पवित्र. थोडक्यात या दोन्ही शब्दाचा अर्थ पवित्र वचन असा आहे. म्हणजे या मंत्राचा अर्थ असा की, अल्लाह खेरीज दूसरा कोणी उपास्य नाही.

**२. नमाजः-** नमाज म्हणजे परमेश्वराची प्रार्थना. इस्लाम धर्मियांना दिवस व रात्र मिळूण एकुण पाच वेळेस नमाज पढणे आवश्यक असते. या पाच वेळा पूढील प्रमाणे आहेत.

I) नमाज-ए-फज्र- ही पहाटेची म्हणजे सुर्योदयापूर्वीची पहिली नमाज आहे.

II) नमाज-ए-जोहर- ही दूसरी नमाज सुर्य पश्चिमेकडे कलल्यानंतरीची नमाज आहे.

III) नमाज-ए-अस्त्र- ही तीसरी नमाज सुर्यास्तापूर्वी दिड ते दोन तास म्हणजे साधारणतः चौथ्या प्रहरातील नमाज होय.

IV) नमाज-ए-मगरीब- ही चौथी नमाज असून सुर्यास्तानंतर पढतात.

V) नमाज-ए-इशा- ही रात्रीची आणि पाचवी नमाज आहे. साधारणतः दिड ते दोन तास रात्र झाल्यानंतर ही नमाज पढतात.

नमाज ही मशिदीतच जाऊन करावी असा नियम आहे पण ते न जमल्यास कोठेही स्वच्छ जागेत नमाज पढता येते. नमाज पढणाऱ्या नेत्यास "इमाम" असे म्हणतात. नमाज मक्केकडे तोंड करून पढली जाते.

**३. जकातः-** जकात हे इस्लाम धर्माचे तीसरे तत्व आहे. जकात या शब्दाचा खरा अर्थ आहे दान देणे. संपत्तीवरील धार्मीक करास जकात असे म्हणतात. याचा अर्थ शुद्धिकरण असाही होतो. हा कर दिल्यानंतर करदात्याची उरलेली संपत्ती शुद्ध होते असे मानण्यात येते. दर साल मुसलमानाने आपल्या संपत्तीचा १/४०वा भाग अथवा संपत्तीच्या आडीच टक्के भाग गोरगरीबांना आणि गरजूंना दान धर्म म्हणून दिला पाहिजे. कुराणानुसार जकात देणे अणिवार्य आहे. आपल्या संपत्तीचा आवश्यक तेवढा हिस्सा गारगरीबांना वाटण्याच्या क्रियेला जकात असे म्हणतात.

**४. रोजाः-** रमजान हा इस्लाम धर्माचा पवित्र महिना असून या महिन्यात रोजे ठेवणे म्हणजे उपवास करणे हे एक पवित्र कार्य माणले जाते. रोजाचा हा उपवास सामान्यतः १२ तासाचा असतो. सुर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अन्नपाणी वर्ज करणे, सर्व प्रकारचे वृतस्थ जीवन घालविणे यालाच रोजा ठेवणे असे म्हणतात. सुर्यास्तानंतर खजूर खाऊन उपवास सोडतात. रमज म्हणजे भाजणे, पोळणे यावरून रमजान हा शब्द आला आहे. रामजान महिन्यात रोजा केल्यामूळे सर्व पापे जळून जातात अशी श्रद्धा आहे. रमजान हा मुसलमान कालगणनेनुसार नववा महिना आहे. रोजाच्या महिन्यात ज्यांना शक्य असेल त्यांनी एका गरीब मानसास जेवण घालावे असे आदेश आहेत. कुरान रमजान महिन्यात प्रकट झाले म्हणून हा पवित्र महिना मानला जातो.

**५. हजः-** हजला जाणे म्हणजे मक्केची यात्रा करणे होय. जीवनातून एकदातरी मक्केची यात्रा करणे आवश्यक समजले जाते. हज ला गेले म्हणजे जीवनात सर्व काही मिळाले असा आत्मीक आनंद मक्केच्या यात्रेकरूला मिळतो. मक्का हे मुसलमानांचे तिर्थ क्षेत्र आहे. हज या आरबी शब्दाचा अर्थ संकल्प करणे अथवा एखादया ठिकाणी पुष्कळदा जाणे-येणे असा आहे. परमेश्वराने पृथ्वीवर दोन वस्तू फेकल्या एक आदम (मनुष्य) आणि काळा दगड पृथ्वीवर फेकलेला काळा दगड 'काबा' या मस्जिदी मध्ये आहे. हजला जाऊन आलेल्या व्यक्तीने संसारात कमलपुष्पाप्रमाणे रहावे संसारात राहूनही निवृत्त जिवण जगावे. हजहुन आलेल्या मानसास हाजी असे म्हणतात. मक्केला गेल्यानंतर सैतानाला सात दगड मारावे म्हणेजे मुसलमान पापमुक्त होतो असी श्रद्धा आहे.

इस्लाम धर्माची इमारत वरील पाच आधारस्तंभावर उभी आहे. या पाच तत्वांशिवाय प्रत्येक मुसलमानास परिपूर्ण मुसलमान होण्यासाठी बंधुभाव, मुर्तीपूजा न करणे, डुकराचे मांस न खाणे, व्याजाने पैसे न देणे, अशा तत्वांची अमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

थोडक्यात वरील सर्व तत्वांचे, नियमांचे पालन करणे मुसलमानास अत्यावश्यक आहे. या सर्व नियमांचे पालन करणे प्रत्येक मुसलमान मणूष्याचे कर्तव्य आहे. इस्लाम धर्माने बंधुभावाला अत्यंतीक महत्व दिले आहे.जन्मताच माणूस निष्पाप असतो परंतू नंतर तो जेंव्हा पाप पुण्य करतो ते सगळे संस्काराचे परीणाम असतात. आपले जीवन चांगले करायचे की वाईट हे त्याने निश्चित करायचे आसते तोच आपल्या भविष्याचा शिल्पकार असतो एवढेच नव्हे तर फसवणूक करणे, ढोंग करणे, कठोरपणा करणे, हव्यास, निर्दयता,अप्रमाणिकपणा,



Scanned by CamScanner

क्रोध, परनिंदा, संशय वृत्ती, असत्य बोलणे, मद्यपान, व्याभीचार व जुगार यासारख्या बाबींचा त्याग करून इश्वर प्राप्तीसाठी चांगले वर्तण ठेवणे हेच सच्च्या मुसलमान व्यक्तींचे परम कर्तव्य आहे.

संदर्भ-

१. डॉ.भा.की.खडसे- समाजशास्त्र- हिमालया पब्लीसिंग हाऊस, प्रथम आवृत्ती २००७
२. डॉ.दा.धो.काचोळे- भारतीय समाज रचना- कैलास पब्लीकेशन -प्रथम आवृत्ती २०१०
३. डॉ.काचोळे /कुलकर्णी - भारतीय समाज रचना -कैलास पब्लीकेशन -प्रथम आवृत्ती १९९४
४. डॉ.विजय देशपांडे / बर्दापूरकर - भारतीय समाज संरचना- विद्या बूक्स, प्रथम आवृत्ती १९९८

❏❖❏



Scanned by CamScanner



मुंडे रामकिशन हरीदास

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | मुंडे रामकिशन हरीदास |
| पद | : | सहाय्यक प्राध्यापक |
| शिक्षण | : | एम.ए. (समाजशास्त्र), नेट, एम.फिल. |
| महाविद्यालय | : | एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला महाविद्यालय, बिडकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद. |
| शैक्षणिक अनुभव | : | मागील तीन वर्षापासून कला महाविद्यालय, बिडकीन येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत. |
| शोधनिबंध | : | राष्ट्रीय, स्थानिक, परिषदेत शोधनिबंधाचे वाचन व शोधनिबंध प्रकाशित. |
| संपर्क | : | ९७६३०९९६०७ |

Scanned by CamScanner